नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६०/२०१६

बाळकृष्ण सावंत वि. जयवंत सावंत

निशाण क्र. १५९ लगत

**प्रतिवादी क्र. १ चा पुढील सरतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.पी.व्ही.बोडस यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१०. मी दाव्यामध्ये कागद यादी निशाणी क्र. ५९/१ वर मुळ बक्षीसपत्र गिरजाबाई शंकर राणे यांनी मला करुन दिलेले दाखल केले असून त्यावर गिरजाबाई शंकर राणे यांचा अंगठा असून तो मी ओळखतो. सदरचे बक्षीसपत्र माझ्या समक्ष झालेले आहे. (वादीच्या वकीलांनी सदरच्या बक्षीसपत्रास निशाणी देण्यास हरकत नोंदविली. सदरचे बक्षीसपत्र हे १९७२ सालचे असून त्यामध्ये लाभार्थी हे स्वतः प्रतिवादी क्र. १ हे असून त्यांनी ते स्वतःच हजर केले असल्यामुळे सदरच्या बक्षीसपत्रास **निशाणी क्र. १७४** देण्यात येते.) निशाणी क्र. ५९/२ वर वनखात्याकडून झाडे तोडण्याबाबतचा परवानगीचा आदेश दाखल केला असून त्यास **निशाणी क्र. १७५** देण्यात येते. याकामी मी निशाणी ७२ च्या यादीसोबत एकूण ७१ मनिऑर्डरच्या पावत्या दाखल केल्या असून सदरच्या मनिऑर्डस् मी गिरजाबाई हिला केलेल्या होत्या. त्यावर गिरिजाबाई हिचे अंगठे आहेत. त्यावर पाठविणारा म्हणून माझे नाव नोंद आहे. त्यास **निशाणी १७६/१ ते १७६/७१** देण्यात येते. ०० वादीच्या वकीलांनी सदरच्या पावत्यांना निशाणी देण्यास हरकत नोंदविली. मी याकामी निशाणी ७२ च्या अर्जासोबत फेरफार क्र. ११०२ ची नमूना नं. ९ ची मुळ नोटीस दाखल आहे. त्यास **निशाणी क्र. १७७** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

वादीच्या विधिज्ञांच्या विनंतीवरुन प्रतिवादीचा उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

श्रीमती एन.बी.घाटगे

दि. ०८/११/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.